| MHNS240004952013 | पांडूरंग शामराव वनीस<br>वि.<br>इंदुबाई दगा वनीस  व इतर |
|---|---|

## निशाणी ११३ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.९ अर्जुन धना वनीस, प्रतिवादी क्र.१० केदा अण्णा वनीस, प्रतिवादी क्र. १२ श्रावण जिभाउ वनीस व प्रतिवादी क्र. १४ वामन धना वनीस यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा चालू असताना वादीने दाखल केलेल्या वाटपाच्या दाव्यात प्रतिवादी क्र. ९, १०, १२ व १४ हे अनुक्रमे दिनांक १६/०२/२०१८, १५/०५/२०१५, ०१/०७/२०१६ व १८/०१/२०१४ रोजी मयत झालेले आहेत, ही बाब वादींना नंतर समजली. त्यामुळे दाव्याचे कामकाज सुरू असताना मयत झालेल्या या प्रतिवादींच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामील करण्यासाठी वादी सदर अर्ज सादर करीत आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर करुन अर्ज कायदेशीर व बरोबर नाही. परंतू प्रतिवादी हे २०१६, २०१८, २०१४ व दि. १५.०५.२०१५ मध्ये मयत असून वादीचे उलटतपासामध्ये आले असून वादीला

सदर अर्जातील त्रुटी भरुन काढणेकामी दिला आहे. तसेच विलंबाचे सुयुक्तीक कारण दिले नसून सदरचा अर्ज नामंजुर करणयाची विनंती केली आहे.

**०४.** अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये दाखल केलेला आहे. सदरहू नियमाप्रमाणे प्रतिवादीच्या मृत्यूपश्चात दावा चालविणेचा अधिकार अबाधित रहात असेल तर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेची तरतूद आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकामी दाखल केला आहे. सबब दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.९, १०, १२ व १४ यांच्या मृत्यूपश्चात देखील दावा चालविणेचा हक्क व अधिकार अबाधित राहतो. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. प्रतिवादी क्र.९ अर्जुन धना वनीस, प्रतिवादी क्र.१० केदा अण्णा वनीस, प्रतिवादी क्र. १२ श्रावण जिभाउ वनीस व प्रतिवादी क्र. १४ वामन धना वनीस चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांना कोणतीही तोषीस लागत नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

रे.मु.नं. ६१/२०१३
पांडूरंग वि. इंदुबाई

# आदेश

१. अर्ज निशाणी क्र.११३ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात नमुद प्रतिवादी क्र.९ अर्जुन धना वनीस, प्रतिवादी क्र.१० केदा अण्णा वनीस, प्रतिवादी क्र. १२ श्रावण जिभाउ वनीस व प्रतिवादी क्र. १४ वामन धना वनीस चे वारसाबाबत दाव्यात प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्ती प्रत दाखल करुन पुढील पुर्तता सत्वर करावी.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.04.01 17:22:24 +0530

ठिकाण : सटाणा
दिनांक : ०१/०४/२०२६

( मधुसूदन दिनकर महाडीक )
२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा,
जि. नाशिक